भारतीय जनता पार्टी

डॉ. किरीट सोमैया

Chartered Accountant, Ph.D.

प्रसिद्धीसाठी

डिसेंबर ३१, २००८

## २६/११ दहशतवाद ग्रस्तांना मदत आणि लालफितीचा कारभार
## मानवाधिकार आयोगाकडे विनंती अर्ज

२६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्यांचा आणि त्यांच्या कुटुंबांचा त्रास सुरू झाला आहे. त्यांना वेगवेगळ्या १०ते १२ एजन्सीजकडे धावाधाव करावी लागत आहे. भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यानी यात हस्तक्षेप करण्यासाठी आणि विविध विभाग, सरकारी एजन्सीज् यांना दावे पूर्णत्वाला नेण्यासाठी, ३ महिन्यांच्या आत भरपाई देण्यासाठी विनंती अर्ज दाखल केला आहे.

बळी पडलेल्या व्याक्तिंना अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागत आहे-

१. एक महिना उलटून गेला तरीही, त्यांना मृत्यूचे प्रमाणपत्र, शवचिकित्सा अहवाल वगैरे मिळविण्यासाठी यातायात करावी लागत आहे. .

२. राज्य सरकार, जिल्हाधिकारी कार्यालये यांनी दुर्लक्ष करायला सुरवात केली आहे आणि केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने जाहीर केलेली रु. ३ लाखांची आणि पंतप्रधान कार्यालयाची रु. २ लाखांची मदत देण्याचे नाकारले जात आहे.

**अनेक एजन्सीज्, १२ ठिकाणी धावपळ, समन्वयाचा अभाव-**

१. रुग्णालये आणि शवचिकित्सा अहवाल

२. एफआयआरसाठी मुंबई पोलीस

३. दहशतवाद विरोधी पथक

४. रेल्वे

५. रेल्वे क्लेम्स टीब्यूनल

६. रु. ५ लाखाच्या भरपाईसाठी महाराष्ट्र सरकार

७. गृह मंत्रालय, केंद्र सरकार, रु. ३ लाखांच्या भरपाईसाठी

८. रु. २ लाखांच्या भरपाईसाठी पंतप्रधानांचे कार्यालय

९. रुग्णालयाकडील प्रमाणपत्र

१०. देवा सादर करण्यासाटी जिल्हाधिकारी कार्यालय

**वैद्यकीय उपचार- योग्य प्रकारचे उपचार मिळण्यात अडचणी**

डॉ. किरीट सोमैय्या यांनी आज बळी पडलेल्या व्यक्तिच्या समवेत मानवाधिकार आयोगाची भेट घेतली आणि आयोगाकडे ८४-पानी विनंती अर्ज दाखल केला. विनंती अर्जात आदेश देण्यासाठी विनंती करण्यात आली आहे कि,

१. पोलीसांना रु. २५ लाख भरपाईच्या संदर्भातील पुनर्वसन विभागाचा बेकायदेशीर, नितीशून्य जीआर मागे ताबडतोब मागे घेण्यात यावा.

२. स्रव मदत आणि पुनर्वसनांच्या कामासाठी एक खिडकी योजना म्हणून काम करण्यासाठी एका नोडल मंत्र्याची आणि नोडल सचिवाची नेमणूक करण्यात यावी जेणेकरून आपत्तीग्रस्त व्यक्तिंना इकडेतिकडे धावपळ करावी लागू नये.

३. विविध सरकारी एजन्सीज् ज्यामध्ये समाविष्ट आहेत पुनर्वसन मंत्रालय, गृह मंत्रालय, जिल्हाधिकारी कार्यालये, रेल्वे, पंतप्रधानांचे कार्यालय यांना आपत्तीग्रस्तांना/त्यांच्या कुटुंबाना भरपाईचे दावे सादर करण्यासाठी व्यवस्था.

४. महाराष्ट्र सरकारच्या रु. ५ लाखाच्या भरपाईसाठी सर्व कागदपत्रे पूर्ण झाली असल्यांमुळे महाराष्ट्र सरकारला पंतप्रधान निधी, गृह मंत्रालयाची योजना यातील आर्थिक भरपाई, धनादेश देण्यासाठी, थेट बँक क्रेडिटद्वारे जमा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारला समन्वय साधण्यास सांगणे.

५. वरिष्ट सरकारी अधिकाऱ्याने सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे (मृत्यू प्रमाणपत्र, शवचिकित्सा अहवाल वगैरे) एजन्सीजकडून गोळा करावीत आणि ती आपत्तीग्रस्तांना/त्यांच्या कुटुंबाना उपलब्ध करून द्यावीत.

६. बंदुकीच्या गोळ्यांनी जखमी झालेल्या व्याक्तिंच्या उपचारासाठी विशेष व्यवस्था केली जावी.

७. मनोहर सहानी यांचे शव त्यांच्या वडिलांच्या ऐवजी भलत्याच अज्ञात माणसाच्या ताब्यात देण्याच्या प्रकाराची चौकशी करावी.

८. मदत आणि पुनर्वसनाच्या कामात माणुसकीचा स्पर्श असावा.

Neelam Nagar, Mulund East, Mumbai 400 081▪ Tel: 21634152 ▪ kirit@vsnl.in▪ www.kiritsomaiya.com